उद्यान कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र.:- उकाजा/ २५९३
दिनांक :- २९/०७/२०२५

दरपत्रक चौकशी

प्रति,

-------------------------

-------------------------

विषय -:'राजीव गांधी प्राणी संग्रहालय येथे प्राण्यांच्या खाद्यासाठी वाळलेले गवत पुरवठा करणे' या कामाकरिता दरपत्रक सादर करणेबाबत.

महोदय,

पुणे महानगरपालिकेच्या 'राजीव गांधी प्राणीसंग्रहालयातील प्राण्यांच्या खाद्यासाठी वाळलेले गवत पुरवठा करणे' या कामाकरिता खाली दिलेल्या अटी व शर्तीनुसार दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | दैनंदिन मागणी | एकूण वार्षिक मागणी |
|---|---|---|---|
| १. | वाळलेले गवत पुरविणे | ७५ किलो | २७,३७५ किलो |

१) वरील यादीतील मालाचे दर दरपत्रकामध्ये सादर करणे आवश्यक आहे.

२) प्राणीसंग्रहालयातील प्राण्यांच्या खाद्यासाठी वाळलेले गवत पुरविणे या कामाकरिता अंदाजित रक्कम काढण्याकरिता दरपत्रक मोहर बंद पाकिटात सादर करणे आवश्यक आहे. सदर पाकिटावर दरपत्रक चौकशीचा जावक क्र. नमूद करावा. ई-मेलद्वारे सादर केलेले दरपत्रक स्वीकारले जाणार नाहीत.

३) सदर मालाचा पुरवठा सकाळी ०९:३० वाजता राजीव गांधी प्राणीसंग्रहालय येथे करावा लागेल.

४) पुरवठा करताना माल निकृष्ठ असल्यास ठेकेदारास तो त्याच दिवशी बदलून द्यावा लागेल.

५) दरपत्रक मधील परिमाण अंदाजे असून जेवढा माल लागेल तेवढाच घेतला जाईल.

६) सदरचे दरपत्रक मा. मुख्य उद्यान अधिक्षक, उद्यान विभाग, पुणे महानगरपालिका यांच्या नावाने मोहर बंद पाकिटात उद्यान कार्यालय, छत्रपती संभाजीराजे उद्यान, जंगली महाराज रस्ता, शिवाजीनगर, पुणे-०५ येथे सादर करावेत.

७) दरपत्रक सादर करण्याची शेवटची तारीख १२/०८/२०२५ व वेळ २:३० वाजेपर्यंत आहे. नियोजित तारखेनंतर आणि वेळेनंतर प्राप्त झालेले दरपत्रक स्वीकारले जाणार नाहीत.

८) दरपत्रकात सादर केलेले दर निविदा संपुष्टात येईपर्यंत एकसारखे राहतील.

९) प्रस्तुत कामासाठी खालीलप्रमाणे अनुभवाची अट आवश्यक आहे.

अ) केंद्रिय प्राणीसंग्रहालय प्राधिकरण मान्यताप्राप्त प्राणीसंग्रहालये, शासकीय / निमशासकीय / महामंडळाच्या वतीने संचालित प्राण्यांचे प्रक्षेत्र यांना समाधानकारक माल पुरवठा करण्याचा अनुभव.

अथवा

आ) भारतातील घोडे रेस कोर्स / घोडे फार्म यांना समाधानकारक माल पुरवठा करण्याचा अनुभव.

१०) निविदादार राजीव गांधी प्राणीसंग्रहालय येथे मालाचा पुरवठा करत असल्यास / केला असल्यास त्याच्या पुरवठा कालावधीतील त्याने सर्वात शेवटी समाधानकारक माल पुरवठा केलेबाबतचा अनुभवाचा दाखला आवश्यक आहे.

११) कोणतेही कारण न देता, कोणतेही किंवा सर्व दरपत्रक स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांच्याकडे राखीव आहे..

१२) सदर दरपत्रकात सादर केले जाणारे दर बाजारभावाशी सुसंगत असले पाहिजे अन्यथा वाढीव दर ग्राह्य धरले जाणार नाहीत.

| संतोष टिळेकर | मनोज जाधव | डॉ. राजकुमार जाधव | . अशोक घोरपडे |
|---|---|---|---|
| वरिष्ठ लिपिक | लाईव्हस्टॉक सुपरवायझर | संचालक | मुख्य उद्यान अधिक्षक |
| प्राणीसंग्रहालय | प्राणीसंग्रहालय | प्राणीसंग्रहालय | पुणे महानगरपालिका |
| पुणे महानगरपालिका | पुणे महानगरपालिका | पुणे महानगरपालिका | |